# प्रतिभा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांद्वारे जनजागृती

**चिंचवड, दि. २१ (वार्ताहर)** - चिंचवड येथील कमला शिक्षण संस्था संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज महाविद्यालयातील सायबर योद्ध्यांनी क्विक हील फाउंडेशनच्या सहाय्याने सुरु असलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रमांतर्गत जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.

निगडी येथील भक्ती-शक्ती येथे झालेल्या पथनाट्यात फिशिंग, ओळख चोरी, आणि ऑनलाइन घोटाळे यांसारखे विविध सायबर धोके प्रभावीपणे दाखवण्यात आले. ही नाटिका मनोरंजक स्वरूपात सादर केली गेली, ज्यामुळे ती सर्व वयोगटातील आणि पार्श्वभूमीच्या लोकांसाठी सुलभ झाली. या प्रयत्नामुळे जनतेमध्ये सायबर हल्ल्यांपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. निगडी पोलिसांनी देखील या कार्यक्रमाला हजेरी लावली.

संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, प्राचार्य डॉ.अरुणकुमार वाळुंज, उपप्राचार्य डॉ. क्षितिजा गांधी, आय क्यू एसी कॉर्डिनेटर डॉ. जयश्री मुळे, डॉ. हर्षिता वच्छानी, एचओडी ऑफ सी एस, तसेच प्रा. सुप्रिया गायकवाड व उज्वला फलक त्याचबरोबर क्विक हिल फाउंडेशनचे संस्थापक अनुपमा काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर, सुगंधा दाणी, मृणाल म्हापुस्कर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.



निगडी : प्रतिभा महाविद्यालयाच्या पथनाट्याद्वारे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी शपथ घेताना विद्यार्थी.